# Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)

Peer Reviewed And Indexed Journal

**ISSN 2349-638X**

**SJIF Impact Factor 8.379**

Website: www.aiirjournal.com


## Theme of Special Issue

## “ Emerging Literary Trends in 21st Century ”

# ‘२१ व्या शतकातील बदलते साहित्यप्रवाह’

**(Special Issue No.160)**


### Chief Editor

**Principal, Dr. Gurunath Fagare**

**Dr. Pramod Tandale**

### Executive Editor

**Prof. (Dr.) C. S. Kamble**

No part of this Special Issue shall be copied, reproduced or transmitted in any form or any means, such as Printed material, CD – DVD / Audio / Video Cassettes or Electronic / Mechanical, including photo, copying, recording or by any information storage and retrieval system, at any portal, website etc.; Without prior permission.

**Aayushi International Interdisciplinary Research Journal**

**ISSN 2349-638x**

Special Issue No.160

Feb.2026

**Disclaimer**

Research papers published in this Special Issue are the intellectual contribution done by the authors. Authors are solely responsible for their published work in this special Issue and the Editor of this special Issue are not responsible in any form.

## Editorial Board

**1) Dr. S. R. Tate (Member)**
**2) Prof. (Dr.) Dr. A. D. Sakat (Member)**
**3) Dr. A. S. Kawade (Member)**
**4) Mrs. N. A. Bhosale (Member)**
**5) Mrs. D. V. More (Member)**

| Sr. No. | Name of the Author | Title of Paper | Page No. |
|---|---|---|---|
| | | **Marathi Papers** | |
| 1. | प्रा. डॉ. सुभाष वाघमारे | २१ व्या शतकातील बदलते साहित्य प्रवाह : काही निरीक्षणे | 1 |
| 2. | प्रो.(डॉ.) चंद्रकांत शंकर कांबळे | २१ व्या शतकातील दलित कथा | 8 |
| 3. | डॉ.धनंजय जालिंदर निंबाळकर | २१ व्या शतकातील मराठी गझल कवितेचे स्वरूप : एक चिकित्सक अभ्यास | 12 |
| 4. | डॉ.संग्राम गोपीनाथ थोरात | पूनम ससाणे यांच्या कथेतील स्त्री व्यक्तिरेखा | 17 |
| 5. | डॉ. अनिलकुमार दडमल | जागतिकीकरण : सामाजिक विषमता आणि मानवी मूल्ये , जातवान व विनशन मधील प्रतिबिंब | 22 |
| 6. | प्रा. डॉ. विपीन नारायण वैराट | एकविसाव्या शतकातील मराठी कादंबऱ्यातील पर्यावरणाचे दर्शन | 27 |
| 7. | डॉ.वैजयंतीमाला जाधव | मराठी साहित्य आणि आदिवासी चळवळ | 31 |
| 8. | डॉ. व्यंकट बाबूराव सूर्यवंशी | २१ व्या शतकातील मराठी ग्रामीण कादंबरी : एक दृष्टिक्षेप | 38 |
| 9. | प्रा. डॉ. अरविंद हंगरगेकर | 'आनंदी आनंद गडे' या बालकथा संग्रहातील मूल्यशिक्षण आणि जीवनदृष्टी | 42 |
| 10. | प्रा.संजय रामचंद्र साळुंखे | २१ व्या शतकातील मराठी कवितेतील पर्यावरणाचे दर्शन | 47 |
| 11. | प्रा. डॉ. राजकुमार श्रीधर पवार | समकालीन वास्तव आणि एकविसाव्या शतकातील मराठी कादंबरी | 54 |
| 12. | प्रा. डॉ. सागर अशोक पाटील | 'एक भाकर तीन चुली' : पुरुषसत्ताक व्यवस्थेविरुद्धची संघर्षगाथा | 59 |
| 13. | डॉ.अनंता कस्तुरे | कृत्रिम बुद्धिमत्ता (AI )आणि मराठी टायपिंगमधील बदल | 62 |
| 14. | प्रा. डॉ. सुरेश पांडुरंग रासकर | अपंग व्यक्तिप्रधान साहित्यप्रवाह निर्मितीची पार्श्वभूमी, स्वरूप आणि संकल्पना | 66 |
| 15. | डॉ. संजयकुमार मधुकर सरगडे | भुरा : स्वत:चा शोध घेणाऱ्या जिद्दी तरुणाचा प्रेरणादायी प्रवास | 74 |
| 16. | डॉ. अमोल सुभाष कवडे | ग्रामीण वास्तवाचे नवे आयाम : 'उसवण' आणि 'खरडछाटणी' च्या संदर्भात | 77 |
| 17. | प्रा.बळीराम शिवाजी डोके | २००० साला नंतरचा मराठीतील पारलिंगी साहित्य प्रवाह | 81 |

# ग्रामीण वास्तवाचे नवे आयाम : 'उसवण' आणि 'खरडछाटणी' च्या संदर्भात

**डॉ. अमोल सुभाष कवडे**
सहायक प्राध्यापक, मराठी विभाग,
किसन वीर महाविद्यालय, वाई

**प्रस्तावना :**

मराठी साहित्यातील ग्रामीण कादंबरी ही वास्तववादी परंपरेचा एक प्रभावी आणि संवेदनशील प्रवाह मानली जाते. विसाव्या शतकातील ग्रामीण कादंबऱ्यांमध्ये गावाचे पारंपरिक जीवन, जातीयता, गरिबी, श्रमसंस्कृती आणि मानवी नातेसंबंध यांचे चित्रण मोठ्या ताकदीने झाले. मात्र एकविसाव्या शतकात ग्रामीण जीवनाच्या रचनेत आमूलाग्र बदल घडू लागले. जागतिकीकरण, उदारीकरण, तंत्रज्ञानाचा वाढता प्रभाव, बाजारव्यवस्थेचे वाढते दडपण, स्थलांतर आणि बदलती जीवनमूल्ये यांमुळे गावाचे सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक स्वरूप झपाट्याने बदलत आहे. त्यामुळे समकालीन ग्रामीण कादंबरीत नव्या वास्तवाचा आणि बदलत्या जीवनपद्धतींचा परामर्श अधिक ठळकपणे आढळतो.

एकविसाव्या शतकातील ग्रामीण कादंबऱ्यांमध्ये पारंपरिक व्यवसायांचे अधःपतन, शेतीसमोरील वाढती आर्थिक व पर्यावरणीय संकटे, बेरोजगारी, स्थलांतर, गावातील राजकीय सत्तासंघर्ष, जातीयतेचे नवे स्वरूप, तसेच बदलती कुटुंबव्यवस्था यांचे वास्तववादी चित्रण दिसून येते. आधुनिकतेच्या रेट्यामुळे गावातील परंपरागत जीवनपद्धती ढासळत असताना ग्रामीण समाज नव्या परिस्थितीशी जुळवून घेण्यासाठी अविरत झगडताना दिसतो. या संघर्षातून निर्माण होणारे मानसिक, सामाजिक आणि आर्थिक ताणतणाव हे समकालीन ग्रामीण कादंबरीचे महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य ठरते.

या संदर्भात देवीदास सौदागर यांची 'उसवण' ही कादंबरी पारंपरिक व्यवसायांचे झालेले अधःपतन आणि बदलत्या ग्रामीण अर्थकारणाचे वास्तव अत्यंत संवेदनशीलपणे मांडते. बदलत्या बाजारव्यवस्थेमुळे आणि आधुनिक जीवनशैलीच्या प्रभावामुळे गावातील पारंपरिक कामधंदे कसे मागे पडतात, त्यातून निर्माण होणारी आर्थिक व सामाजिक अस्थिरता या कादंबरीतून प्रकर्षाने समोर येते. त्याचप्रमाणे नामदेव माळी यांची 'खरडछाटणी' ही कादंबरी नव्या शेतीसमोरील आव्हाने, वाढता उत्पादनखर्च, अनिश्चित हवामान, बाजारपेठेतील अस्थिरता आणि शेतकऱ्यांच्या मानसिकतेतील बदल यांचे वास्तववादी चित्रण करते. या दोन्ही कादंबऱ्या ग्रामीण जीवनातील बदलत्या परिस्थितीचे प्रतिनिधित्व करणाऱ्या आणि नव्या ग्रामीण वास्तवाचे विविध आयाम उलगडून दाखवणाऱ्या महत्त्वाच्या साहित्यकृती ठरतात.

म्हणूनच एकविसाव्या शतकातील मराठी ग्रामीण कादंबरी ही केवळ गावाचे चित्रण करणारा साहित्यप्रकार न राहता, बदलत्या ग्रामीण जीवनाच्या सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक वास्तवाचे विश्लेषण करणारी सशक्त साहित्यप्रवृत्ती बनली आहे. प्रस्तुत शोधनिबंधात 'उसवण' आणि 'खरडछाटणी' या कादंबऱ्यांच्या संदर्भात पारंपरिक व्यवसायांचे अधःपतन आणि नव्या शेतीसमोरील आव्हाने या दोन महत्त्वाच्या अंगांचा अभ्यास करून ग्रामीण वास्तवाचे नवे आयाम उलगडण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

पारंपरिक व्यवसायांचे अधःपतन : 'उसवण' कादंबरीच्या अनुषंगाने

देवीदास सौदागर यांची *'उसवण'* ही कादंबरी ऑगस्ट २०२२ मध्ये प्रकाशित झाली असून तिला २०२४ चा युवा साहित्य अकादमी पुरस्कार मिळाला आहे. प्रस्तुत कादंबरी विठूच्या (एका प्रामाणिक शिंप्याच्या) पराभवाची आणि वेदनेची कहाणी आहे. कादंबरीचा नायक विठू हा प्रामाणिक आणि कष्टाळू टेलर असून वडिलांपासून चालत आलेला शिंप्याचा व्यवसाय तो निष्ठेने चालवितो. या व्यवसायात त्याची पत्नी गंगा त्याच्या पाठीशी खंबीरपणे उभी असते. त्यांच्या संसारात सुभाष आणि नंदा ही दोन गोंडस मुले असून तीदेखील शाळा आणि अभ्यास सांभाळून आपापल्या परीने विठूला व्यवसायात हातभार लावतात.

परंतु अलीकडच्या काळात व्यवसाय जेमतेमच चालत होता. भीमा पवारसारखी माणसे उधारी वेळेवर देत नव्हती; सरपंच आणि मुख्याध्यापकांसारखे प्रतिष्ठित लोक विनामूल्य काम करून घेण्याच्या प्रवृत्तीचे ठरले होते. शिवाय रेडीमेड कपड्यांचा वापर वाढल्याने गिऱ्हाईकांची संख्या रोडावली होती. त्यामुळे कुटुंबाची आर्थिक ओढाताण सुरू झाली होती.

एका बाजूला व्यवसायाची ही दुर्दशा होत असताना, दुसऱ्या बाजूला गावातील वातावरणही गढूळ होत चालले होते. नव्या पिढीचा राजकारणात शिरकाव होत होता. यात्रेच्या निमित्ताने दमदाटी करून युवक वर्गणी मागत होते. एक दिवस विविध पक्षांचे झेंडे शिवण्यावरून विठूच्या दुकानात दोन गटांत मारामारी होते आणि त्या भांडणाची चौकशी विनाकारण त्यालाच सहन करावी लागते.

असे असले तरी जगू चव्हाण, महादेव महाराज, साळुंखे सर यांच्या रूपाने गावात माणुसकी अजून जिवंत असल्याचे दिसून येते. एक दिवस सरपंचाच्या घरातून एक पिशवीभरून कपडे दुरुस्तीसाठी येतात, त्यावेळी बापू त्याला म्हणतात, *"विठू, या बारीला पैशे घेतल्याबिगर काम करू नकू."* त्यावर विठू उत्तरतो, *"कुटं माशाया संग वैर धरावं बापू पान्यात राहून."* यावरून गावातील सत्ताधाऱ्यांची सर्वसामान्य माणसांच्या मनावर असलेली दहशत स्पष्टपणे जाणवते.

या विपरीत परिस्थितीत महादेव महाराज तत्त्वज्ञानाचा आधार देतात, *"माणूस संसारिक असू की संन्यासी असू, त्याला शिवण्याची कला आली पाहिजे. फाटलेल्या समद्या गोष्टी शिवता आलं पायजी."* हे उद्गार केवळ व्यवसायाविषयी नसून जीवनाकडे पाहण्याच्या व्यापक दृष्टिकोनाची ग्वाही देतात.

टेलरिंगचा व्यवसाय बंद पडल्याने साळुंखे सरांच्या भावाला लग्नासाठी मुलगी मिळणे कठीण झाले आहे, तर रेडीमेड कपड्यांमुळे कपडे शिवणाऱ्यांची संख्या घटल्याने लक्ष्मणासारखे कित्येक जण शहराकडून गावी परतताना दिसतात. विठूच्या गावातही एस.टी.च्या फेऱ्या वाढल्या होत्या, रेडीमेड कपड्यांच्या जाहिराती सर्वत्र झळकत होत्या आणि लोक तालुक्याला जाऊन तयार कपडे आणत होते.

अशातच एक दिवस आपल्या गावातच रेडीमेड कपड्यांचे दुकान उघडल्याचे विठूला समजते. आधीच वर्षभरात धंदा कमी असल्याने कर्जाचा बोजा वाढलेला, त्यात गावातच स्पर्धा उभी राहिली. धंदा आणखी बुडणार या विचाराने विव्हळ झालेला विठू दुकान कायमचे बंद करण्याचा कठोर निर्णय घेतो आणि हे गंगाला बोलून दाखवतो. *काळजावर दगड ठेवावा लागंल आता. दोन पिढ्या काम केलं ते काम, ती जागा, ही समद्या गोष्टी सोडून देताना जीवाला थरथरी सुटल्यागत झालंय. दोन दिसाचा पावना आला तर जीव लागतयं. ही तर दोन पिढ्यांचं काम आहे.* नाईलाजाने विठू भरल्या डोळ्यांनी दुकानाच्या उंबरठ्यावर माथा टेकवतो आणि आपल्या वडिलांची सारी हयात व स्वतःचे बरेचसे आयुष्य ज्या दुकानात उलटले, त्या दुकानाला कायमचा निरोप देतो. हे चित्रण केवळ एका व्यक्तीच्या व्यावसायिक अपयशाचे नाही, तर पिढ्यानपिढ्या जपलेल्या कारागिरी संस्कृतीच्या अस्तांचे आहे.

**नव्या शेतीसमोरील आव्हाने : 'खरडछाटणी' कादंबरीच्या अनुषंगाने**

समकालीन मराठी ग्रामीण कादंबरीच्या परंपरेत नामदेव माळी यांची *'खरडछाटणी'* ही कादंबरी विशेष लक्ष वेधून घेते. द्राक्षशेती या प्रातिनिधिक विषयाच्या निमित्ताने एकविसाव्या शतकातील शेतकरी जीवनातील आर्थिक, सामाजिक, मानसिक आणि कौटुंबिक संघर्षांचे वास्तववादी दर्शन घडविणारी ही कादंबरी आहे. केवळ द्राक्षशेतीभोवती फिरणारी मर्यादित कथा न राहता ती संपूर्ण शेतकरी वर्गाच्या वेदनांचे प्रतिनिधित्व करते.

प्रस्तुत कादंबरीचा नायक तानाजी हा आधुनिक काळातील शेतकऱ्यांचे जिवंत प्रतीक आहे. तानाजी, सुदामा आणि संपत हे तीन भाऊ, या कुटुंबकथेच्या माध्यमातून लेखकाने नातेसंबंधांतील ताणतणाव, जबाबदाऱ्या आणि अंतर्गत घालमेल प्रभावीपणे उभी केली आहे. संपत शिक्षकी पेशात असून आपल्या शेती करणाऱ्या भावांना मदत करण्याची त्याची तीव्र इच्छा आहे; परंतु पत्नीच्या विरोधामुळे तो त्यांना हातभार लावू शकत नाही. या द्वंद्वातून निर्माण होणारी त्याची मानसिक कोंडी कादंबरीला भावनिक खोली प्रदान करते.

दुसरीकडे तानाजी आणि सुदामा यांच्या कष्टाळू शेतकरी जीवनाचे चित्रण अत्यंत वास्तववादी आहे. सावकारांचे कर्ज, नैसर्गिक आपत्ती, व्यापारी वर्गाचे साटेलोटे आणि कोसळलेले बाजारभाव यांमुळे शेती सातत्याने तोट्यात जात आहे. केवळ तानाजीचीच नव्हे, तर परिसरातील इतर शेतकऱ्यांचीही हीच दुर्दशा असल्याचे लेखक ठळकपणे मांडतो.

कर्जबाजारीपणामुळे जमीन गमावून वेडा झालेला गोपाताता आणि त्यातून त्याने केलेली आत्महत्या, ही घटना शेतकरी शोषणाच्या टोकाच्या परिणामांचे विदारक चित्र उभे करते. व्यापाऱ्यांनी पैसे बुडवून पळून जाण्याचे प्रसंग, सावकारांकडून होणारी लुबाडणूक आणि शासनव्यवस्थेची प्रत्यक्ष अनुपस्थिती या प्रश्नांवर 'खरडछाटणी' सूचक पण ठोस भाष्य करते.

या संघर्षमय जीवनात तानाजीला मानसिक व भावनिक आधार देण्याचे काम त्याची आई आवडाक्का करते. सततच्या अपयशाने, कर्जबाजारीपणाने आणि सामाजिक दबावाने खचलेल्या तानाजीला ती वेळोवेळी धीर देते. आई म्हणून तिची भूमिका केवळ ममतेपुरती मर्यादित राहत नाही; संकटसमयी ती तानाजीसाठी खऱ्या अर्थाने आधारस्तंभ ठरते. तिच्या शब्दांतून आणि आचरणातून शेतकरी जीवनातील सहनशीलता, त्याग आणि आशेचा संदेश व्यक्त होतो. त्यामुळे 'खरडछाटणी'मधील आवडाक्का हे पात्र ग्रामीण कुटुंबातील आईचे संघर्षशील, धैर्यशील आणि प्रेरणादायी रूप साकारते.

'खरडछाटणी' मध्ये पारंपरिक कोरडवाहू शेतीकडून बागायती पिकांकडे वळताना शेतकऱ्यांना सहन करावी लागणारी आर्थिक, मानसिक आणि सामाजिक होरपळ प्रभावीपणे मांडली आहे. बदलते ग्रामीण जीवन, शेतीतील आधुनिकतेची स्वप्ने आणि त्यामागील कठोर वास्तव यांच्या द्वंद्वातून उभी राहणारी ही कादंबरी समग्र शेतकरी जीवनाचे प्रतिनिधित्व करते. एकूणच 'खरडछाटणी' ही केवळ द्राक्षशेतीची कथा न राहता, एकविसाव्या शतकातील भारतीय शेतकऱ्यांच्या संघर्षांची साक्ष देणारी आणि आधुनिक शेतीसमोरील आव्हाने अधोरेखित करणारी महत्त्वपूर्ण कादंबरी ठरते.

**उसवण आणि खरडछाटणी या कादंबऱ्यांचा तुलनात्मक अभ्यास :**

'उसवण' आणि 'खरडछाटणी' या दोन कादंबऱ्यांचा एकत्रित अभ्यास केला असता, एकविसाव्या शतकातील ग्रामीण महाराष्ट्राच्या बदलत्या चेहऱ्याचे एक व्यापक आणि वेदनादायी चित्र समोर येते. या दोन्ही कादंबऱ्यांमध्ये ग्रामीण समाजाला भेडसावणाऱ्या वेगवेगळ्या संकटांचे वास्तवदर्शी निरूपण असले, तरी त्यांच्या केंद्रस्थानी एकच सूत्र आहे ते म्हणजे आधुनिकतेच्या रेट्यात पिचत जाणारा, परंतु प्रतिकूलतेशी झुंजत उभा राहणारा सामान्य माणूस.

'उसवण' मधील विठू हा केवळ एका शिंप्याचा पराभव नव्हे, तर शतकानुशतके जोपासलेल्या कारागिरी संस्कृतीचे विस्मरण होण्याचे प्रतीक आहे. रेडीमेड कपड्यांच्या बाजारावर पिढ्यानपिढ्याच्या कौशल्याने मिळवलेल्या जीविकेचे होणारे अवमूल्यन अत्यंत व्यथित करणारे आहे. विठूचे अश्रू फक्त एका व्यक्तीचे नाहीत; ते संपूर्ण परंपरागत कारागीर समाजाच्या सामूहिक वेदनेचे प्रतिनिधित्व करतात. या कादंबरीतून देवीदास सौदागर यांनी हे स्पष्ट केले आहे की, बाजाराच्या जागतिकीकरणाचा सर्वाधिक फटका बसतो तो ग्रामीण स्तरावरील पारंपरिक कारागीर आणि लघुव्यावसायिकांना.

त्याचप्रमाणे 'खरडछाटणी' मधील तानाजीचा शेतीशी चाललेला संघर्ष हा केवळ एका शेतकऱ्याची कथा नाही, तर बदलत्या शेती अर्थव्यवस्थेत स्वतःला सावरण्याचा प्रयत्न करणाऱ्या अगणित शेतकऱ्यांचे प्रतिनिधित्व करतो. सावकारशाही, व्यापारी वर्गाचे शोषण, हवामान बदलाचे परिणाम आणि सरकारी यंत्रणांची अनुपस्थिती यांच्या जात्यात सापडलेला शेतकरी आपल्या जमिनीशी, आपल्या स्वप्नांशी अजूनही घट्ट धरून राहतो, हे नामदेव माळी अत्यंत मार्मिकतेने मांडतात.

या दोन्ही कादंबऱ्यांमधील पात्रांचे संघर्ष वेगळे असले तरी त्यांच्यातील साम्यसूत्र उल्लेखनीय आहे. विठू आणि तानाजी दोघेही आपापल्या वारशावर प्रेम करणारे, जबाबदारीने कर्तव्य पार पाडणारे, परंतु बाह्य शक्तींपुढे हतबल होणारे नायक आहेत. दोन्ही कादंबऱ्यांमध्ये कुटुंबाचा आधारस्तंभ असणाऱ्या स्त्री-पात्रांचे — गंगा आणि आवडाक्का यांचे चित्रण विशेष लक्षणीय आहे. या स्त्रिया केवळ साथसोबत देत नाहीत, तर संकटसमयी नायकांना उभारी देणाऱ्या शक्तिस्रोत ठरतात.

भाषिक दृष्टिकोनातून पाहिल्यास दोन्ही कादंबऱ्यांतील ग्रामीण बोलीभाषेचा वापर त्यांना विशेष जिवंतपणा प्रदान करतो. *"पान्यात राहून माशाशी वैर धरू नये"* यासारख्या लोकोक्ती आणि ग्रामीण जीवनातील उक्ती-प्रयुक्ती कादंबऱ्यांच्या

वास्तवदर्शिततेला आणखी धार देतात. या ठिकाणी भाषा ही केवळ आविष्काराचे माध्यम न राहता, ग्रामीण संस्कृतीचे वाहक बनते.

तौलनिक दृष्टीने विचार केला तर *'उसवण'* ही पारंपरिक व्यवसायांचे बाजारीकरणाच्या लाटेत होणारे विघटन चित्रित करते, तर *'खरडछाटणी'* शेती क्षेत्राच्या संरचनात्मक संकटाचे विश्लेषण करते. दोन्ही कादंबऱ्या मिळून एकविसाव्या शतकातील ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या दोन महत्त्वाच्या परिमाणांना उत्पादन आणि व्यापार यांना स्पर्श करतात. त्यामुळे त्यांचा एकत्रित अभ्यास हा ग्रामीण महाराष्ट्राचे संपूर्णपणे आकलन करण्यास साहाय्यभूत ठरतो.

**समारोप :**

एकूणच *'उसवण'* आणि *'खरडछाटणी'* या कादंबऱ्या एकविसाव्या शतकातील मराठी ग्रामीण साहित्याला नवी उंची आणि नवा आशय प्रदान करतात. या दोन्ही कादंबऱ्या ग्रामीण जीवनाचे रोमँटिक चित्रण करण्याऐवजी त्याच्या वेदना आणि आव्हाने यांचे वास्तवदर्शी निरूपण करतात. बाजाराच्या असमान स्पर्धेत टिकून राहण्याचा विठूचा प्रयत्न असो, किंवा निसर्ग आणि व्यवस्थेशी झुंजत शेती टिकवण्याचा तानाजीचा संघर्ष असो, दोन्ही आपापल्या परीने ग्रामीण माणसाच्या अदम्य जगण्याची साक्ष देतात.

**संदर्भ :**


१) सौदागर देविदास, उसवण, देशमुख आणि कंपनी प्रा. लि, पुणे.

२) माळी नामदेव, खरडछाटणी, शब्द पब्लिकेशन मुंबई


Aayushi International Interdisciplinary Research Journal ISSN 2349-638X www.aiirjournal.com